# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024



मार्गदर्शन करताना ॲड. प्रीती पटवा, समवेत प्रा. शिरीष पवार व इतर.

# समाजाच्या जडणघडणीत शिक्षकाची भूमिका महत्त्वाची : ॲड. प्रीती पटवा

पाटण, दि. १३ : आपणाला आयुष्यावर प्रेम करता आले पाहिजे. आपला आनंद कशात आहे हे शोधून जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. आहे त्या परिस्थितीचा स्वीकार करून पुढे जाण्यात शहाणपण आहे. जे तुमच्याकडे नाही, त्याकडे दुर्लक्ष करा. जे तुमच्याकडे आहे त्याकडे लक्ष द्या, तरच जीवन यशस्वी होईल, असे प्रतिपादन ॲड. प्रीती पटवा यांनी केले.

पाटण येथे बाळासाहेब देसाई महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, सारथीचे विलास पाटील, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी सुहास देशमुख, संचालक साहेबराव देशमुख, डॉ. प्रल्हाद चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, पृथ्वीराज पाटील, कृष्णराजे राजेमहाडिक, कॉलेजचे प्राचार्य शिरीष पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. प्रीती पटवा म्हणाल्या, शिक्षकाने आधुनिकतेला व तंत्रज्ञानाला स्वीकारून विद्यार्थी घडवावा. अध्यात्म आणि आधुनिकतेची सांगड घालावी. शिक्षक पेशासारखे दुसरे जिवंत क्षेत्र कोणतेच नाही. तुम्हाला जे आवडते ते काम आवडीने करा. आयुष्यात जिद्द खूप महत्त्वाची आहे. स्टीफन हॉकिन्स, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम, हिमादास यांनी खडतर परिस्थितीतून यशाची शिखरे गाठलेली आहेत. परिस्थितीचा स्वीकार यशाकडे घेवून जातो. जोखीम स्वीकारल्यास त्यातून आयुष्याचा मार्ग सापडतो. इच्छा असेल तर मार्ग सापडतो. आयुष्यात अडचणी आल्यास त्याला आनंदाने सामोरे जावा. देव जेव्हा एक दरवाजा बंद करतो त्यावेळी तो आपल्यासाठी अनेक दरवाजे खुले करत असतो. आपण एक दरवाजा बंद झाला म्हणून खचून जायचे नाही. त्याला आनंदाने सामोरे जायचे, असे त्यांनी सांगितले.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. दीपक पाटील व प्रा. डॉ. हेमलता काटे यांनी सूत्रसंचालन केले.

प्राचार्य शिरीष पवार यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यायातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.